श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर,जि.धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

■ Web Site: https://www.shrituljabhavani.org ■ E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com

ISO : 9001 : 2008

जा.क्र.:- श्रीतुभमंसंतु/2026-27/भांडार/ 1889 दिनांक :- 15/09 /2026

# परिपत्रक

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर येथे शारदीय नवरात्र महोत्सव वेळी 12-12 तास जबाबदाऱ्या सोपविण्यात आलेल्या असल्याने कार्यालयीन कर्मचारी तसेच संपूर्ण वर्षभर कार्यालयीन बैठकांच्यावेळी, महत्वाचे व अतिमहत्वाचे व्यक्ती यांच्याकरिता शुध्द शाकाहारी भोजन व्यवस्था करणेकरिता इच्छूक नामांकित पुरवठाधारकांकडून सीलबंद दरपत्रक मागविण्यात येत आहेत. आपले सीलबंद दरपत्रक दिनांक 16 /09/2026 पासून ते दिनांक 23/09/2026 पर्यंत निम्नस्वाक्षरीतांचे नावे प्रशासन कार्यालयात आवक जावक विभागात कार्यालयीन वेळेत सादर करावेत.

| अ.क्र. | तपशील | परिमाण | जी.एस.टी. सह दर |
|---|---|---|---|
| 1) | **जेवण:-**<br>1. **चपाती/ भाकरी**<br>2. **भात**<br>3. **एक सुकी भाजी**<br>4. **एक पातळ भाजी**<br>5. **सपक वरण**<br>6. **एक दर्जेदार गोड पदार्थ**<br>7. **सलाड**<br>8. **लोणचे/चटणी/ठेचा/पापड**<br>वरील पदार्थ आवश्यकतेनुसार पोटभर देणे बंधनकारक आहे. | प्रति नग | |
| 2) | **फराळ (उपवास) - प्लेट**<br>**शाबू, दहीवाटी/ भगर, आमटी** | प्रति नग | |
| 3) | **फराळ (उपवास) - पोटभर** (नवरात्र महोत्सव कालावधीकरिता)<br>**शाबू, दहीवाटी/ भगर, आमटी, शेंगालाडू /डिंकलाडू, बटाटा चिप्स/चिवडा** | प्रति नग | |
| 4) | **अल्पोपहार (नाष्टा)-**<br>**पोहे / उपीट / शिरा / कचोरी / समोसा / वडापाव/ दहिवडा/ ढोकळा** | प्रति नग | |
| 5) | **चहा किंवा कॉफी** | प्रति नग | |

➢ **अटी व शर्ती** :-

1) सीलबंद दरपत्रके शक्य झाल्यास त्याच दिवशी दुपारी 05:00 वाजेपर्यंत निम्नस्वाक्षरीत यांचे कार्यालयात उपस्थित पुरवठाधारक अथवा त्यांचे प्रतिनिधी यांचे समक्ष अथवा पश्चात उघडण्यात येतील.
2) मंदिर संस्थानने दिलेल्या वेळापत्रकानुसार पुरवठाधारकाने भोजन आणि फराळ मंदिर कार्यालयात आणि अल्पोपहार व चहाचा पुरवठा कार पार्किंग येथे स्वखर्चाने पोहोच व वाटप करावयाचा आहे.
3) सादर केलेले दर मंजूर झाल्यापासून एक वर्षापर्यंत ग्राह्य धरले जातील.
4) पुरवठाधारकांनी साहित्याचा पुरवठा करतेवेळी देयकासोबत पॅन कार्ड देणे आवश्यक आहे.
5) पुरवठाधारकांने आपले दर हे जी.एस.टी., आयकर व इतर अनुषंगिक करांसह द्यावयाचे आहेत.

श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान
तुळजापूर,जि.धाराशिव (महाराष्ट्र)-४१३ ६०१
दूरध्वनी : ०२४७१ - २४२०३१

Shri Tuljabhavani Temple Trust
Tuljapur, Dist. Dharashiv (Mah.) - 413 601
Tel. : 02471 - 242031

■ Web Site: https://www.shrituljabhavani.org ■ E-mail : shreetuljabhavanitemple@gmail.com

ISO : 9001 : 2008

6) पुरवठाधारकाने दरपत्रक सादर करतवेळी जी.एस.टी. नोंदणी क्रमांक देणे आवश्यक आहे.

7) मंजूर पुरवठाधारकास आपले देयक हे टॅक्स इन्व्हाईस व जी.एस.टी.च्या नियमांनुसार देणे बंधनकारक राहील.

8) एक वर्षात कार्यालयाच्या आवश्यकतेनुसार मंजूर दराप्रमाणे भोजन, फराळ व अल्पोपहार पुरवठा नाही केल्यास निम्नस्वाक्षरीत हे सरकारी नियमाप्रमाणे आकारतील तो दंड भरणे पुरवठाधारकांवर बंधनकारक असले.

9) कमी प्रतिचे अथवा निकृष्ठ दर्जाचे भोजन, फराळ व अल्पोपहार पुरवठा केल्याचे आढळून आल्यास त्यांचे देयक अदा करण्यात येणार नाही.

10) पुरवठाधारकांने मंदिर संस्थानला पुरवठा केलेल्या, मागणी केलेल्या भोजन, फराळ व अल्पोपहार परिमाणांमध्ये कमी प्रमाण आढळल्यास, दर्जा व्यवस्थित आढळून न आल्यास सर्वस्वी जबाबदारी पुरवठाधारकाची राहील व निम्नस्वाक्षरीत ठरवतील त्याप्रमाणे पुरवठाधारकावर कारवाई करण्यात येईल.

11) मागणी केलेल्या भोजन, फराळ व अल्पोपहार पुरवठा मंदिर प्रशासन कार्यालयात करावयाचा आहे. त्याकरिता कोणतेही ॲडव्हान्स रक्कम अथवा वाहतूक खर्च दिला जाणार नाही.

12) निश्चीत केलेल्या दरामध्ये कोणत्याही सबबीवर पुरवठाधारकास वाढ मागता येणार नाही. सदर दरामध्ये वाढ करणे संस्थानवर बंधनकारक राहणार नाही.

13) कोणतीही दरपत्रके स्विकारण्याचा अगर नाकारणेचा अधिकार मंदिर संस्थान व्यवस्थापनाने राखून ठेवलेला आहे. त्याबद्दल कारण देणे मंदिर संस्थान व्यवस्थापनावर बंधनकारक राहणार नाही.

(माया माने)
तहसिलदार तथा
व्यवस्थापक (प्रशासन)
श्री तुळजाभवानी मंदिर संस्थान, तुळजापूर